# आघारकर संशोधन संस्थेने विकसित केलेल्या गहू आणि सोयाबीन वाणांचे पैदासकार/ब्रीडर बियाणे उपलब्धता

- गहू आणि सोयाबीन पैदासकार बियाणे मागणी/demand संस्थेच्या बियाणे विक्री इमेल seedsale@aripune.org या द्वारेच घेण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

- महाबीज (MAHABEEJ), एनएससी (NSC), राज्य सरकारी बियाणे एजन्सी (State Govt. Agencies) आणि शेतकरी उत्पादक संस्था (FPO) यांना प्राधान्य देण्यात येईल. बियाणे उचलण्याची जबाबदारी सर्वस्वी इंडेनटिंग (Demand) करणाऱ्या पार्टीची राहील.

**शेतकरी उत्पादक संस्थानी (FPO) बियाणे घेतांना खालील अटींचे पालन करावे:**

- बियाणे उचलताना **एफपीओ नोंदणी प्रमाणपत्राची** स्कॅन प्रत ईमेलद्वारे किंवा हार्ड प्रत स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील.
- जर तुम्ही बियाणे उत्पादन कार्यक्रम घेत असाल, तर त्याची सरकारच्या **SATHI पोर्टल** (https://seedtrace.gov.in) अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे.
- तुम्ही मागील वर्षाच्या बियाणे उत्पादन कार्यक्रमाचा तपशील दिल्यावरच पुढील वर्षाचा इंडेंट स्वीकारली जाईल. याचा अर्थ जर तुम्ही बियाणे साखळीत असाल तरच पैदासकार बियाण्यासाठी मागणी/इंडेंट स्वीकारली जाईल.

**पेमेंट:** गाहक उपलब्ध **POS (पोइंट ऑफ सेल)** मशिन द्वारे संस्थेच्या बँक खात्यामध्ये बियाणाची योग्य ती रक्कम **QR कोड/डेबिट कार्ड/फोन पे/गुगल पे** या माध्यमाद्वारे पेमेंट करू शकता आणि पेमेंटच्या पुराव्यानंतरच वरील पत्त्यावरून बियाणे उचलू शकता. (क्रेडीट कार्ड वापरता येणार नाही).

**बियाणे विक्री केंद्र पत्ता:**

**प्रायोगिक आणि संशोधन फार्म,**
**आघारकर संशोधन संस्था, होळ फार्म (8 फाटा)**
**निरा – बारामती रोड, तालुका – बारामती, जिल्हा – पुणे**
**पिन – ४१२३०६ (महाराष्ट्र)**
**गूगल स्थळ:** https://goo.gl/maps/Kekc7g5iht6uKyVm7
**ऑफिसची वेळ: सकाळी 9.00 ते संध्याकाळी 5.00**
(जेवणाची वेळ: दुपारी 1.00 ते 2.00)

**- ARI, Seed Team**

**नियम आणि अटी:**

- गहू ब्रीडर बियाण्याचे पेमेंट आणि उचल वर नमूद केलेल्या कालावधीत केले जाईल; अन्यथा, कोणतीही सूचना न देता ते रद्द केले जाईल. **एकदा पेमेंट केल्यावर, ते कोणत्याही कारणास्तव रद्द केले जाणार नाही.**
- आम्ही तुम्हाला विनंती करतो की तुम्हाला वाटप केलेल्या रकमेसाठी कोणतेही **अतिरिक्त पेमेंट करू नका कारण कोणताही परतावा दिला जाणार नाही.**
- बियाणे उचलण्याची व्यवस्था इंडेंटर्स/कॅन्साइनीने सुनिश्चित केली पाहिजे. **पार्सलची कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही.**